कोल्हापूरचा अजिंक्य रेडकर बनला 'नवी मुंबई महापौर श्री'

नवी मुंबई, दि. २२ (वार्ताहर): विष्णुदास भावे नाट्यगृहात संपन्न झालेल्या 'नवी मुंबई महापौर श्री' राज्यस्तरीय शरीरसौष्ठव स्पर्धेत कोल्हापूरच्या अजिंक्य रेडकर याने १२८ स्पर्धकांमधून सर्वोत्कृष्ट कामगिरी करत १.५० लाख रुपयांच्या बक्षिसासह मानाचा चषक आणि २०२५-२६ चा किताब पटकावला. सोलापूरच्या पंचाक्षरी लोणार यांनी ५० हजारांच्या बक्षिसासह उपविजेतेपद मिळवले, तर ठाण्याच्या मोहम्मद जमालला 'मोस्ट इम्प्रुव्हड' आणि रायगडच्या स्वप्निल सकपाळला 'बेस्ट पोझर' पुरस्कार (प्रत्येकी १५ हजार रु.) प्रदान करण्यात आला. स्थानिक स्तरावरील 'नमुंमपा क्षेत्र श्री' स्पर्धेत नेरूळच्या निरंत पाटील याने ७० हजार रुपयांसह विजेतेपद, तर अक्षय पाटील याने ३८ हजार रुपयांसह उपविजेतेपद मिळवले. ६ वर्षांच्या खंडानंतर महापौर सुजाता पाटील यांच्या हस्ते या स्पर्धेचा शुभारंभ झाला, ज्याप्रसंगी त्यांनी युवकांना व्यसनांपासून दूर राहण्यासाठी व्यायामाचे आवाहन केले. या सोहळ्याला उपमहापौर दशरथ भगत, माजी खासदार संजीव नाईक, उपायुक्त अभिलाषा म्हात्रे-पाटील, क्रीडा अधिकारी रेवप्पा गुरव आणि शरीरसौष्ठव संघटनेचे राजेंद्र चव्हाण, गोपाळ गायकवाड यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. घणसोली येथे भव्य क्रीडा संकुल उभारण्याचे आणि भविष्यात राष्ट्रीय स्पर्धा घेण्याचे नियोजन यावेळी उपमहापौरांनी जाहीर केले.

स्थानिक स्तरावरील नेरूळच्या निरंत पाटीलने मारली बाजी

महिला शेतकऱ्यांना डिजिटल संसाधने, माहिती व प्रशिक्षण मिळणे आवश्यक– एआय फॉर ॲग्री परिषदेत तज्ज्ञांचे मत

मुंबई, दि. २२ (प्रतिनिधी): एआय हे मानवी बुद्धिमत्तेचा पर्याय नसून सर्वांना संधी देणारे माध्यम ठरू शकते, त्याचा वापर इतर क्षेत्राप्रमाणेच कृषी क्षेत्रासाठीही उपयुक्त आहे. मात्र त्यासाठी महिलांना संसाधने, माहिती व प्रशिक्षण मिळणे अत्यावश्यक आहे. मागणी आधारित, सहभागी पद्धतीने विकसित केलेले जबाबदार एआय शेतीच्या शेवटच्या घटकापर्यंत परिवर्तन घडवू शकते, असा सूर 'कृषी क्षेत्रात जबाबदार एआयचा वापर करून लिंगाधारित डिजिटल दरी कशी भरून काढता येईल' या विषयावर पार पडलेल्या परिसंवादात उमटला.

'महाराष्ट्र कृषी–कृत्रिम बुद्धिमत्ता धोरण २०२५–२०२९' अंतर्गत आयोजित एआय फॉर अग्री या जागतिक कृषी–कृत्रिम बुद्धिमत्ता परिषद व गुंतवणूकदार शिखर संमेलनामध्ये 'कृषी क्षेत्रात जबाबदार एआयचा वापर करून लिंगाधारित डिजिटल दरी कशी भरून काढता येईल' या विषयावर परिसंवाद पार पडला. या परिसंवादात एम.एस. स्वामीनाथन रिसर्च फौंडेशनच्या अध्यक्ष सौम्या रंगनाथन, संचालक मंडळ सदस्य पूर्वी मेहता, ग्रो इंडिगोच्या कार्यकारी संचालक उषा झेहर, पाणी फाऊंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित भटकळ, युनिव्हर्सिटी ऑफ ईस्ट अँग्लिया युनायटेड किंगडमच्या प्राध्यापक (लिंग व विकास अभ्यास) डॉ. नित्या राव, यूएन वुमन, भारत देश प्रतिनिधी कांता सिंह, तसेच पद्मश्री पुरस्कार विजेत्या शेतकरी राहिबाई पोपेरे सहभागी झाल्या.

देशातील अस्थिर शेती व्यवस्था, हवा, पाण्याचे वाढते प्रदूषण आणि मातीच्या खालावलेल्या गुणवत्तेमुळे निर्माण होणाऱ्या पोषण संकटाकडे परिसंवादातील तज्ज्ञांनी लक्ष वेधले. आज अन्न पुरेशा कॅलरी देत असले तरी ते आरोग्यदायी नाही. त्यामुळे कुपोषण, महिलांमध्ये व मुलांमध्ये ॲनिमिया, तसेच लठ्ठपणा, मधुमेह व हृदयरोगांसारख्या असंसर्गजन्य आजारांचे ओझे वाढत आहे. २०४७ पर्यंत भारत विकसित राष्ट्र बनवायचा असेल तर शेती पोषण प्रणालींमध्ये तातडीने सुधारणा आवश्यक असल्याचे डॉ. सौम्या स्वामीनाथन यांनी स्पष्ट केले.

तंत्रज्ञानामुळे उत्पादकता वाढू शकते; मात्र महिलांच्या बाबतीत स्मार्टफोन, इंटरनेट, यांत्रिकीकरण व सल्लागार साधनांपर्यंत पोहोच मर्यादित असल्याने मोठी डिजिटल दरी निर्माण झाल्याचे मत यावेळी मान्यवरांनी मांडले. महिलांच्या नावावर जमीन नसल्यामुळे कर्ज, योजना, पाणीहक्क आणि डेटा सिस्टीमपासून त्या दूर राहतात, हा मुद्दाही चर्चेत ठळकपणे मांडण्यात आला.

पूर्वी उच्च उत्पादनक्षम वाण विकसित करण्यासाठी अनेक दशके लागत होती; मात्र जेनोमिक डेटा व अल्गोरिदमच्या वापरामुळे हे काम काही महिन्यांत शक्य होत असल्याचे यावेळी सांगण्यात आले. पीक काढणीचा अचूक अंदाज, पीक व रोगनिदानासाठी फोटो-आधारित ॲप्स, पशुधन विक्रीसाठी केवळ छायाचित्रावर आधारित ऑनलाईन व्यवहार आदिमुळे शेतकऱ्यांचे नुकसान कमी होऊन उत्पन्नात वाढ होत असल्याचे सांगण्यात आले.

देशातील सुमारे ४८ टक्के शेती व ७९ टक्के पशुपालन महिलांकडून केले जाते; मात्र बहुतांश एआय मॉडेल्स पुरुष-केंद्रित आणि काही मोजक्या पिकांवरील डेटावर आधारित असल्याने 'डेटा गॅप' निर्माण झाला आहे. एआयमध्ये समावेशकता आणण्यासाठी महिलांच्या कामाशी संबंधित पिके, पशुपालन व स्थानिक पद्धतींचा डेटा समाविष्ट करणे गरजेचे असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

पाणी फाऊंडेशनमार्फत राज्यात ३० हून अधिक प्रशिक्षण केंद्रे सुरू असून त्यातील ६५ टक्के प्रशिक्षणार्थी महिला आहेत. महाराष्ट्र शासन 'महा कृषी' उपक्रमातून एआय-सक्षम सल्ला लाखो शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवत असल्याची माहिती पाणी फाऊंडेशनचे संजय भटकळ यांनी दिली. महिला शेतकरी हक्कांबाबत धोरणात्मक पावले उचलण्याची गरजही यावेळी मान्यवारांनी अधोरेखित केली.

सरपंचांना सहा महिन्यांची मुदतवाढ शासनाच्या निर्णयाचे स्वागत

नांदेड, दि. २२ (वार्ताहर): राज्य शासनाने ग्रामपंचायत निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत किंवा कमाल सहा महिन्यांपर्यंत विद्यमान सरपंचांना प्रशासक म्हणून मुदतवाढ देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतल्याने हिमायतनगर तालुक्यात समाधान व्यक्त करण्यात येत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली घेतलेल्या या निर्णयाबद्दल तालुक्यातील सरपंच बांधवांकडून स्वागत करण्यात येत आहे.

तालुक्यातील सुमारे ५० ग्रामपंचायतींचा पाच वर्षांचा कार्यकाळ ७ ते १२ फेब्रुवारी २०२५ दरम्यान संपला होता. त्यानंतर प्रशासक म्हणून पंचायत समिती विस्तार अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली होती. मात्र, हिमायतनगर तालुक्यासह राज्यभरातील सरपंच संघटनांनी निवडणुका होईपर्यंत विद्यमान सरपंचांनाच प्रशासक म्हणून कायम ठेवावे व उपसरपंच व सदस्यांना जैसे थे ठेवावे, अशी मागणी शासनाकडे केली होती. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी परिस्थितीची दखल घेत राज्यपालांकडे वस्तुस्थिती मांडली. त्यानुसार राज्यपालांच्या आदेशाने विद्यमान सरपंचांना सहा महिन्यांसाठी अथवा निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंतप्रशासक म्हणून नियुक्ती देण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला.

या निर्णयामुळे 'दहा-दहा गावांसाठी एका प्रशासकावर जबाबदारी देणे अवघड ठरले असते. ग्रामीण भागातील समस्या लक्षात घेऊन विद्यमान सरपंचांनाच जबाबदारी देण्याचा निर्णय योग्य आहे

राज्य शासनाच्या या निर्णयामुळे तालुक्यातील बहुतांश सरपंच बांधवांकडून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस (देवाभाऊ) तसेच उपमुख्यमंत्र्यांवर कौतुकाचा वर्षाव होत आहे. दरम्यान, शासनाच्या आदेशामुळे ग्रामपंचायतींचे कामकाज अखंडितपणे सुरू राहणार असल्याने तालुक्यातील विकासकामांना गती मिळणार असल्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

पाक हल्ल्यानंतर अफगाणिस्तानचा लष्करप्रमुख जनरल मुनीर यांना कठोर प्रत्युत्तर देण्याचा इशारा

काबुल, दि. २२ (वृत्तसंस्था): अफगाणिस्तानवर पाकिस्तानकडून करण्यात आलेल्या हवाई हल्ल्यात किमान २० हून अधिक लोकांचा मृत्यू झाल्याची माहिती आहे. अफगाणी माध्यमे आणि सुरक्षा सूत्रांच्या माहितीनुसार आतापर्यंत 18 मृतदेह बाहेर काढण्यात आले असून बचावकार्य अद्याप सुरू आहे. या एअर स्ट्राइकनंतर अफगाणिस्तानात तीव्र संतापाची लाट उसळली आहे. अफगाणिस्तानने महिलां-मुलांच्या हत्येचा आरोप करत पाकिस्तानी लष्करप्रमुख जनरल मुनीर यांना कठोर प्रत्युत्तर देण्याचा इशारा दिला आहे.

इस्लामिक एमिरेट ऑफ अफगाणिस्तान (तालिबान सरकार) चे प्रवक्ते जबिहुल्ला मुजाहिद यांनी पाकिस्तानने नंगरहार आणि पक्तिका प्रांतांवर केलेल्या हवाई हल्ल्यांवर तीव्र प्रतिक्रिया दिली. त्यांनी म्हटले की, पाकिस्तानातील जनरल आपल्या देशातील अंतर्गत सुरक्षा कमकुवतपणा लपवण्यासाठी महिलां आणि मुलांना लक्ष्य करत आहेत. मुजाहिद यांनी 'एक्स' (पूर्वीचे ट्विटर) वर पोस्ट करत म्हटले की, "पाकिस्तानी जनरल आपल्या देशातील सुरक्षा त्रुटींची भरपाई अशा गुन्ह्यांद्वारे करण्याचा प्रयत्न करत आहेत."

अफगाणिस्तानच्या म्हणण्यानुसार, पाकिस्तानी सैन्याने अफगाण हद्दीत घुसखोरी करून नागरिकांवर हल्ला केला. नंगरहार प्रांतातील बेहसूद जिल्ह्यातील एका नागरिकाच्या घराला लक्ष्य करण्यात आले, जिथे एकाच कुटुंबातील २३ सदस्य ढिगाऱ्याखाली अडकले. मृतांमध्ये किमान १२ लहान मुले आणि किशोरवयीन मुलांचा समावेश आहे. नंगरहार आणि पक्तिका प्रांतांत एकूण डझनावारी नागरिक ठार आणि जखमी झाल्याचे सांगितले जात आहे. पक्तिका प्रांतातील बेरमाल येथे असलेल्या एका धार्मिक मदरशालाही या हल्ल्यात फटका बसल्याची माहिती आहे.

दरम्यान पाकिस्तानने या हल्ल्यांची कबुली दिली असून ते "गुप्त माहितीवर आधारित निवडक कारवाई" असल्याचे म्हटले आहे. पाकिस्तानच्या म्हणण्यानुसार, या कारवायांमध्ये तेहरिक-ए-तालिबान पाकिस्तान (टीटीपी) आणि इस्लामिक राज्य – खोरासान प्रांत (आयएसकेपी) यांच्या सात ठिकाणांना लक्ष्य करण्यात आले. हे हल्ले अफगाणिस्तानातून कार्यरत दहशतवादी गटांवर केंद्रित होते, असा दावा पाकिस्तानने केला आहे.तर अफगाण संरक्षण मंत्रालयाने या कारवाईचा तीव्र निषेध करत हा अफगाण सार्वभौमत्वाचा उघड भंग असल्याचे म्हटले आहे. त्यांनी "योग्य वेळी मोजून मापून प्रत्युत्तर दिले जाईल" असा इशाराही दिला आहे. हे हल्ले पाकिस्तानमध्ये अलीकडे झालेल्या आत्मघाती बॉम्बस्फोटांच्या पार्श्वभूमीवर करण्यात आल्याचे सांगितले जात आहे. त्यात इस्लामाबादमधील शिया मशिदीवरील हल्ल्याचाही समावेश असून त्यात डझनावारी लोकांचा मृत्यू झाला होता.

ऑक्टोबर २०२५ मधील सीमावादातील संघर्षानंतर, ज्यात ७० हून अधिक लोकांचा मृत्यू झाला होता, दोन्ही देशांतील तणाव वाढलेला आहे. या ताज्या घटनेमुळे पाकिस्तान आणि अफगाणिस्तान यांच्यातील तणाव पुन्हा एकदा तीव्र झाला आहे.

महापारेषणची 'सहाय्यक अभियंता' भरती परीक्षा राज्यातील १११ केंद्रांवर यशस्वी संपन्न

मुंबई, दि. २२ (प्रतिनिधी): महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या (महापारेषण) १३४ सहाय्यक अभियंता (स्थापत्य) पदांसाठीची लेखी परीक्षा २२ फेब्रुवारी २०२६ रोजी राज्यातील १११ केंद्रांवर अत्यंत सुरळीत आणि शांततेत पार पडली. एकूण २३ हजार ३३६ अर्जांपैकी १५ हजार ५४१ उमेदवारांनी मुंबई, पुणे, नागपूर यांसह राज्यातील प्रमुख जिल्ह्यांमध्ये उपस्थित राहून परीक्षा दिली.

महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार यांच्या नेतृत्वाखाली आणि कार्यकारी संचालक सुचिता भिकाने यांच्या मार्गदर्शनाखाली सीसीटीव्ही, व्हिडिओग्राफी आणि कडक पोलीस बंदोबस्तात पारदर्शक पद्धतीने ही प्रक्रिया राबवण्यात आली. कोणत्याही अनुचित घटनेशिवाय आणि इलेक्ट्रॉनिक वस्तूंवर कडक बंदी घालत महापारेषणने केलेल्या नियोजनबद्ध व्यवस्थेमुळे ही महत्त्वाची परीक्षा यशस्वीरीत्या पूर्ण झाली असून उमेदवारांनीही या शिस्तबद्ध आयोजनाबद्दल समाधान व्यक्त केले आहे.

सार्वजनिक जाहीर नोटीस

याद्वारे कळिवण्यात येते की मूळ शेअर प्रमाणपत्र क्र. 031 (शेअर क्र. 151 ते 155) व हस्तांतरण मेमोरँडम, श्री. प्रभाकर अगळावे व श्रीमती प्रतिभा अगळावे यांच्या नावावरील, फ्लॅट क्र. D-13, 3:3, सागर CHS लि., सेक्टर 29, वाशी, नवी मुंबई तसेच दिनांक 04.06.2003 चा Deed of Assignment (नोंदणी पावती क्र.04533) हरवले आहेत.

याबाबत वाशी पोलीस स्टेशन येथे तक्रार नोंद (Register ID: OmrplGMaDF d Oz6sTOr2qi, दिनांक 11.02.2026) करण्यात आली आहे.

सदर कागदपत्रांबाबत कोणाचा काही दावा/हरकत असल्यास त्यांनी 15 दिवसांच्या आत खाली सही करणाऱ्यास लेखी कळवावे, अन्यथा पुढील कार्यवाही करण्यात येईल.

ठिकाणः नवी मुंबई
दिनांकः 11.02.2026

स्वाक्षरी/-
कल्पिता पाटील
फ्लॅट क्र. B-14, परमाणू CHS, सेक्टर 4, वाशी, नवी मुंबई
मो.: 9595527651
ईमेल : kalpitanikam@gmail.com

जाहीर सूचना

तमाम जनतेस या सूचनेद्वारे कळविण्यात येते की, माझे अशील, एचकेएम चैरिटेबल फाउंडेशन, हे खालील नमूद केलेल्या सर्व स्थावर मालमत्तांचे तुकडे आणि भाग खरेदी करण्यास इच्छुक आहेतः **१) सर्व्हे नं. -२९/२,** क्षेत्र एच.आर.पी.- ०-१६-०, निर्धारण रु. २=०८ पैसे, गाव/मौजे- हातनोली, तालुका- खालापूर आणि जिल्हा रायगड, ही मालमत्ता संगीता जी. चामडिया, राजकुमार एन. बजाज, रितू दीपक बजाज आणि सुजाता रवीश सिंहानिया यांच्या मालकीची आहे **२) सर्व्हे नं. -२९/१अ,** क्षेत्र एच.आर.पी.- ०-०२-५, निर्धारण रु. ०=४५ पैसे, गाव/मौजे- हातनोली, तालुका- खालापूर आणि जिल्हा- रायगड, ही मालमत्ता श्री राजकुमार नवरंगरायजी बजाज यांच्या मालकीची आहे **३) सर्व्हे नं. -६५/१,** क्षेत्र एच.आर.पी.- ०-८१-०, निर्धारण रु. ०=८१ पैसे, गाव/मौजे- वावंदळ, तालुका- खालापूर आणि जिल्हा- रायगड, ही मालमत्ता संगीता जी. चामडिया, राजकुमार एन. बजाज, सुजाता रवीश सिंहानिया आणि रितू दीपक बजाज यांच्या मालकीची आहे **४) सर्व्हे नं. -६६/१,** क्षेत्र एच.आर.पी.- ०-२९-०, निर्धारण रु. ०=५० पैसे आणि **सर्व्हे नं. -६५/२,** क्षेत्र एच.आर.पी.- ०-५२-०, निर्धारण रु. १=७६ पैसे, गाव/मौजे- वावंदळ, तालुका- खालापूर आणि जिल्हा रायगड, ही मालमत्ता संगीता जी. चामडिया, राजकुमार एन. बजाज, सुजाता रवीश सिंहानिया आणि रितू दीपक बजाज यांच्या मालकीची आहे **५) सर्व्हे नं. -६६/२,** क्षेत्र एच.आर.पी.- ०-८१-०, निर्धारण रु. ०=८१ पैसे, गाव/मौजे- वावंदळ, तालुका- खालापूर आणि जिल्हा रायगड, ही मालमत्ता संगीता जी. चामडिया, राजकुमार एन. बजाज, सुजाता रवीश सिंघानिया आणि रितू दीपक बजाज यांच्या मालकीची आहे, **६) भाडेतत्वावरील मालमत्ता सर्व्हे नं. -३०,** हिस्सा नं. १, २, ३अ, क्षेत्र एच.आर.पी.- ०-११-० (एकूण ७-६३-० हेक्टर पैकी), गाव/मौजे- हातनोली, तालुका- खालापूर आणि जिल्हा रायगड, ही मालमत्ता स्व. कमलादेवी राजकुमार बजाज (रेकॉर्डनुसार सध्याच्या भाडेपट्टेदार) यांच्या मालकीची आहे, ज्याचा उल्लेख पुढे "सदर मालमत्ता" असा करण्यात आला आहे.

उपरोक्त मालमत्तांच्या मालकांनी सदर मालमत्ता मंदिर आणि गुरुकुल या प्रयोजनासाठी एचकेएम चैरिटेबल फाउंडेशन यांना विक्री, हस्तांतरित आणि प्रदान करण्याचे मान्य केले आहे आणि सदर प्रस्तावित खरेदीदार सध्या सदर मालमत्तांच्या मालकी हक्काची पडताळणी आणि इतर औपचारिकता पूर्ण करण्याच्या प्रक्रियेत आहेत.

कोणतीही व्यक्ती, संस्था, कंपनी किंवा आस्थापना ज्यांचा सदर मालमत्तेवर किंवा त्याच्या कोणत्याही भागावर कोणताही दावा, हक्क, शीर्षक, हितसंबंध, धारणाधिकार, प्रभार, गहाण, भाडेपट्टा, कुळवहिवाट किंवा इतर कोणताही बोजा असल्यास, त्यांनी ही सूचना प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत खालील दिलेल्या पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात कळवावे, अन्यथा कोणताही दावा विचारात न घेता व्यवहार पूर्ण केला जाईल आणि तसे दावे सोडून दिले आहेत असे मानले जाईल.

ही सूचना प्रस्तावित खरेदीदाराच्या वतीने त्यांचे हितसंबंध जपण्यासाठी आणि प्रस्तावित खरेदीची सार्वजनिक नोटीस देण्यासाठी प्रसिद्ध करण्यात आली आहे.

सही/-
ॲड. संदीप कुमार सिंग, एसकेएस ज्यूरिस
प्रस्तावित खरेदीदाराचे वकील
पत्ताः ४०, ६ वा मजला, ऑनलुकर बिल्डिंग, सर पी. एम. रोड, फोर्ट, मुंबई - ४००००१. **ईमेलः** sksjuris@gmail.com
मोबाईलः ८०८००४७२२६

स्थळः मुंबई
दिनांकः २३.०२.२०२६

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

e-TENDER NOTICE

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

RFX	Description	Esti. Cost
Tend25 / 25-26 RFX 7000038594 ... 2nd call	SITC, 22kV feeder for M/s JTL plant at 220kV Kandalgaon S/Stn under EHV (O&M) Circle, Panvel.	**Rs. 35.14 Lakhs**

EMD 1% of estimated cost. **Tender Fee : Rs. 500/- + GST Submission of bids from 20.02.2026 to 02.03.2026 up to 11:00 hrs, Opening date:- 02.03.2026 @ 11:30 Hrs.**
For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/**
Contact Person: The Executive Engineer(Adm) Mob. No. 8412050202
E-mail ID: **se7200@mahatransco.in**

Sd/-
SUPERINTENDING ENGINEER
EHV (O&M) CIRCLE, PANVEL

motilal oswal Home Finance
मोतीलाल ओसवाल होम फायनान्स लिमिटेड

कॉर्पोरेट कार्यालय : मोतीलाल ओसवाल टॉवर, रहिमतुल्ला सयानी रोड, एसटी डेपोच्या समोर, प्रभादेवी, मुंबई-४०००२५.
ईमेल :- hfquery@motilaloaswal.com **सीआयएन क्रमांक :-** U65923MH2013PLC248741

ताबा सूचना (अचल मालमत्तेसाठी)

(सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ८ (१) अंतर्गत)

खाली स्वाक्षरी करणारा हा मोतीलाल ओसवाल होम फायनान्स लिमिटेड (औपचारिकरित्या अस्पायर होम फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड म्हणून ओळखला जातो) चा अधिकृत अधिकारी असल्याने, सिक्युरिटीजेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (५४ ऑफ २००२) अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ३ सह वाचलेल्या कलम १३ (१२) अंतर्गत दिलेल्या अधिकारांचा वापर करून, येथे नमूद केलेल्या तारखेला डिमांड नोटीस जारी केली आहे ज्यामध्ये खालील कर्जदारांना नोटीस मिळाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत येथे नमूद केलेल्या सूचनेत नमूद केलेली रक्कम परत करण्याचे आवाहन केले आहे. खालील कर्जदारांनी रक्कम परतफेड करण्यात अयशस्वी ठरल्याने, खालील कर्जदारांना आणि सर्वसाधारण जनतेला सूचना देण्यात येत आहे की खाली नमूद केलेल्या तारखेला सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ८ सह वाचलेल्या कायद्याच्या कलम १३ च्या उपकलम (४) अंतर्गत त्यांना देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून येथे नमूद केलेल्या तारखेला येथे वर्णन केलेल्या मालमत्तेचा ताबा घेतला आहे.

अनु. क्र.	कर्ज करार क्रमांक / कर्जदार/सह–कर्जदार/ जामीनदारांचे नाव	मागणी सूचना आणि थकबाकीची तारीख	ताब्यात घेतल्याची तारीख	स्थावर मालमत्तेचे वर्णन मालमत्तेचा सर्व भाग व भूखंड आहे
१.	एलएक्सपीएएल००११६–१७००४८६६२ एलएक्सएमओएचओएफ२२१–२२०५६६९८६ कर्जदार : गोपीनाथ गुरव सह–कर्जदार : पराग गोपीनाथ गुरव	११.१०.२०२५ / रु. ८,२०,०६४/– साठी	१६.०२.२०२६	फ्लॅट क्रमांक बी/२०७, क्षेत्रफळ जाहिरात ३१४ चौरस फूट, म्हणजेच २९.१८ चौरस मीटर कार्पेट एरिया, गावठाण हाऊस ऑफ व्हिलेज लोटस पार्क वाकीपाडा चंद्रपाडा चंद्रिका देवी मंदिराजवळ नायगाव (पूर्व). जिल्हा ठाणे – ४०१२०८ पालघर महाराष्ट्र.
२	एलएक्सपीएएन००३१५–१६००१८५०९ एलएक्सएमओएचओएफ१२१–२२०६०४२२० कर्जदार : प्रमोदकुमार संतसाहकश्यप सह–कर्जदार : संतोषकुमार संतसाह कश्यप	०२.१२.२०२५ / रु. २०,३८,३७७/–	१९.०२.२०२६	फ्लॅट क्रमांक ४०४, बी विंग, चौथा मजला, ३६४ चौरस फूट कार्पेट एरिया, इमारत कृष्णा रेसिडेन्सी म्हणून ओळखली जाते, इमारत क्रमांक १, जुना सर्वे क्रमांक १२१, हिस्सा क्रमांक ३, जुना सर्वे क्रमांक १२१, हिस्सा क्रमांक ४अ, जुना सर्वे क्रमांक १२१, हिस्सा क्रमांक ४ब, नवीन सर्वे क्रमांक १५१, हिस्सा क्रमांक ४के, नवीन सर्वे क्रमांक १५१, हिस्सा क्रमांक ४ब, नवीन सर्वे क्रमांक १५१ हिस्सा क्रमांक ४अ, नवीन सर्वे क्रमांक १५१, हिस्सा क्रमांक ३, लोढा हेवन जवळ, निलजे, डोंबिवली (पूर्व) ता. कल्याण, जिल्हा– ठाणे **पूर्वः** शकुंतला व्हिला, **पश्चिमः** शकुंतला एन्क्लेव्ह, **उत्तरः** अभिनव बँक, **दक्षिणः** महामार्ग.

विशेषतः कर्जदार आणि सर्वसाधारणपणे जनतेला याद्वारे इशारा देण्यात येतो की त्यांनी मालमत्तेशी व्यवहार करू नये आणि कोणत्याही मालमत्तेशी संबंधित व्यवहारांवर वर नमूद केलेल्या रकमेचा आणि त्यावरील व्याजाचा आकार मोतीलाल ओसवाल होम फायनान्स लिमिटेडकडून आकारला जाईल.
कर्जदाराचे लक्ष कायद्याच्या कलम १३ च्या उपकलम (८) च्या तरतुदींकडे आकर्षित केले जाते, उपलब्ध वेळेच्या संदर्भात, सुरक्षित मालमत्ता परत करण्यासाठी असेल.

ठिकाण : महाराष्ट्र
तारीख : २३.०२.२०२६
भाषांतरामध्ये त्रुटी आढळल्यास इंग्रजी मजकूर ग्राह्य धरण्यात येईल.
सही/–
अधिकृत अधिकारी
मोतीलाल ओसवाल होम फायनान्स लिमिटेड

महेश डेव्हलोपर्स लिमिटेड
MAHESH DEVELOPERS LTD

(पूर्वीचे महेश डेव्हलोपर्स प्रायव्हेट लिमिटेड म्हणून ज्ञात)
नोदणीकृत कार्यालय : उमा शिखर, १३ वा रोड, खार टेलिफोन एक्सचेजच्या मागे, खार पश्चिम, मुंबई ४०० ०५२, भारत.
ई–मेल : mdplgroup@gmail.com वेबसाइट : www.maheshdevelopers.com
दूर. क्र. ०२२–२६०००३८ सीआयएन : L45200MH2008PLC186276

दि. ३१ डिसेंबर, २०२५ रोजी संपलेल्या तिमाही व नउ महिने अखेरकरिता अलेखापरीक्षित वित्तीय निष्कर्ष

रक्कम लाखात (रु.) ईपीएस वगळता

अनु. क्र.	विवरण	तिमाही अखेर ३१.१२.२०२५ (अलेखापरीक्षित)	तिमाही अखेर ३०.०९.२०२५ (अलेखापरीक्षित)	तिमाही अखेर ३१.१२.२०२४ (अलेखापरीक्षित)	नउ महिने अखेर ३१.१२.२०२५ (अलेखापरीक्षित)	नउ महिने अखेर ३१.१२.२०२४ (अलेखापरीक्षित)	वर्ष अखेर ३१.०३.२०२५ (लेखापरीक्षित)
१.	१. उत्पन्न						
	ए. कार्यचलनामधून महसूल	–	–	–	–	–	–
	बी. अन्य उत्पन्न	–	–	–	०.१७	–	
	सी. इन्वेंटरी मूल्यामध्ये वाढ	–	–		–		
	एकूण महसूल (ए+बी+सी)	–	–	–	०.१७	–	–
२.	२. खर्च						
	ए. कार्यचलन मूल्य	१.५३	०.२०	३.०४	३.४०	(३७.३२)	(६४.७५)
	बी. साहित्यांमध्ये बदल	(५.२८)	(३.२०)	(४.२९)	(१५.१५)	२९.५७	४९.५०
	सी. कर्मचारी लाभ खर्च	०.००	०.००	०.००	०.००	–	
	डी. वित्त मूल्य	०.०२	०.०२	०.००	०.०५	०.०२	०.०६
	ई. डीप्रेसिएशन व अमोर्टिझेशन	०.००	०.००	०.०२	०.०१	०.१४	०.१६
	एफ. अन्य खर्च	०.५७	०.२७	०.७४	३.७८	१०.७२	११.८७
	एकूण खर्च (ए+बी+सी+डी+ई+एफ)	(३.१६)	(२.७१)	(०.४९)	(७.९२)	३.१३	(३.१६)
३.	३. जॉईंट वेचर्स (निव्वळ) व अतिरिक्त बाबींचे नफा/तोटा यांच्या शेअरपूर्व नफा (१–२)	३.१६	२.७१	०.४९	८.०८	(३.१३)	३.१६
४.	४. जॉईंट वेचर्स (निव्वळ) चा नफा/तोटा भाग	–	–	–	–	–	–
५.	५. अतिविशेष बाबी व करपश्चात नफा (३–४)	३.१६	२.७१	०.४९	८.०८	(३.१३)	३.१६
६.	६. अतिरिक्त बाबी (कर खर्चाचे निव्वळ)	–	–	–	–	–	–
७.	७. करपश्चात नफा (५+६)	३.१६	२.७१	०.४९	८.०८	(३.१३)	३.१६
८.	८. कर खर्च						
	चालू वर्ष कर	०.८२	०.७१	–	२.१०	–	०.८२
	डिफर्ड टॅक्स खर्च						
९.	९. कालावधीकरिता करपूर्व निव्वळ नफा (७–८)	२.३४	२.०१	०.४९	५.९८	(३.१३)	२.३४
१०.	१०. अन्य सर्वसमावेशक उत्पन्न						
	१. नफा व तोटा यामध्ये न मोडला जाणाऱ्या बाबी	–	–	–	–	–	–
	२. नफा व तोटा याकरिता पुनःनिर्धारित न केलेल्या बाबीच्या संबंधात आयकर						
११.	११. कालावधीकरिता एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (९+१०)	२.३४	२.०१	०.४९	५.९८	(३.१३)	२.३४
१२.	समभाग भांडवल प्रदान (रु. १० प्रत्येकीचे दर्शनी मूल्य)	४१५.२०	४१५.२०	४१५.२०	४१५.२०	४१५.२०	४१५.२०
१३.	राखीव व सरप्लस (मूल्यांकन राखीव वगळता)	(१३.७७)	(१६.११)	(२१.६१)	(१३.७७)	(२१.६१)	(१९.७५)
१४.	प्रति शेअर उत्पन्न (ईपीएस)※ (रु. १० प्रत्येकी दर्शनी मूल्य)						
	ए. मूळ ईपीएस	०.०६	०.०५	०.०१	०.१४	(०.०८)	०.०६
	बी. डायल्यूटेड ईपीएस	०.०६	०.०५	०.०१	०.१४	(०.०८)	०.०६

टीप :
१. तिमाही व नउ महिने अखेर ३१ डिसेंबर, २०२५ करिता अलेखापरीक्षित वित्तीय अहवाल लेखा समिती यांच्याद्वारे पुनःपाहणी केली आहे व दि. १९ फेब्रुवारी, २०२६ रोजी आयोजित त्यांच्या सभेमध्ये संचालक मंडळाद्वारे मंजूर केले आहे.
२. कंपनीचा वित्तीय अहवाल आयएनडी एएस अनुसार तयार केला आहे.
३. कंपनीच्या तिमाही व नउ महिने अखेर ३१ डिसेंबर, २०२५ दरम्यान केवळ एक रिपोर्टेबल सेगमेंट नावे सिव्हील कन्स्ट्रक्शन ॲन्ड रिअल इस्टेट डेव्हलोपमेट व त्यामुळे विविध सेगमेट अहवाल आवश्यकता लागू नसेल.
४. कंपनी मे. श्रीजी लाईफ स्पेस यांच्यामध्ये ७२% शेअर्सची भागीदार आहे. सदर भागीदारी १० वा रस्ता, खार पश्चिम, मुंबई ४०० ०५२ येथील रहिवासी पुनःविकास पकल्पामध्ये अंमलात आणली आहे. ३१ डिसेंबर, २०२५ अनुसार उर्वरित रु. ७७८.४२ लाख आहे.
५. ईपीएस आयएनडी एएस ३३ समवेत गुणांकन केला आहे.
६. पूर्व आकडेवारी रि-गुप्ड, पुनःव्यवस्थापित व पुनःनिर्धारित केली आहे ती सध्याच्या चालू कालावधीहरिता आवश्यक असेल.
७. दि. ३१ डिसेंबर, २०२५ अखेर तिमाही व नउ महिने अखेरकरिता वित्तीय अहवाल कंपनीची वेबसाइट www.maherhdevelo{err.com वर उपलब्ध आहे व बीएसई लिमिटेड www.breindia.com वर सादर केला आहे ज्यामध्ये कंपनीचे इक्विटी शेअर्सची सूची आहे.

मंडळाच्या आदेशान्वये व त्यांच्या करिता
सही/–
महेश रतिलाल सपारिया
व्यवस्थापकीय संचालक
डीआयएन : ००४१४१०४

ठिकाण : मुंबई
दिनांक : १९.०२.२०२६

Indiabulls ASSET RECONSTRUCTION
इंडियाबुल्स ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड

सीआयएन : U67110MH2006PLC305312
कॉर्पोरेट ऑफिस : वन इंटरनॅशनल सेंटर, टॉवर–१, चौथा मजला, सेनापती बापट मार्ग, एल्फिन्स्टन रोड, मुंबई– ४०००१३
ईमेल : Deepak.dawari@indiabulls.com अधिकृत अधिकारी क्रमांक : +९१ ९३७ १९३ ३०१५

(परिशिष्ट –४–ए) (नियम ८ (६)/ ९(१) मधील तरतुदी पहा)
स्थावर मालमत्तेच्या ई–लिलावासाठी सार्वजनिक सूचना
सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (सरफैसी कायदा) अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई–लिलाव विक्री सूचना, या अटीसह वाचा व सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ चा नियम ८ (६) आर/डब्ल्यू ९(१).

सर्वसाधारणपणे जनतेला आणि विशेषतः कर्जदारांना आणि जामीनदारांना सूचना देण्यात येत आहे की खाली वर्णन केलेली स्थावर मालमत्ता सुरक्षित कर्जदाराकडे गहाण ठेवली आहे/चार्ज केली आहे, ज्याचा ताबा देण्यात आला आहे व इंडियाबुल्स ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड (इंडियाबुल्स एआरसी) च्या अधिकृत अधिकाऱ्याने घेतले आहे. शिवाय, **इंडियाबुल्स ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड (इंडियाबुल्स एआरसी)** (इंडियाबुल्स एआरसी–एक्सआयव्ही ट्रस्टचे विश्वस्त म्हणून काम करत आहे) ने ३०.०३.२०२० रोजीच्या असाइनमेंट कराराद्वारे इंडसइंड बँक लिमिटेड (असाइनर बँक) कडून असाइनर बँकेकडून मूलभूत सुरक्षासह खालील खात्यांचे संपूर्ण थकित कर्ज मिळवले आहे. त्यानुसार, इंडियाबुल्स एआरसीने असाइनर बँकेचे पदभार स्वीकारला आहे आणि थकबाकी वसूल करण्याचा आणि सुरक्षा लागू करण्याचा अधिकार दिला आहे. इंडियाबुल्स एआरसीच्या अधिकृत अधिकाऱ्याने असाइनरकडून खाली नमूद केलेल्या सुरक्षित मालमत्तेचा प्रत्यक्ष ताबा घेतला आहे. इंडियाबुल्स एआरसीचे अधिकृत अधिकारी थकबाकी वसूल करण्यासाठी खाली नमूद केलेल्या सुरक्षित मालमत्तेची विक्री करण्याचा मानस करतात आणि म्हणूनच सुरक्षित मालमत्तेच्या खरेदीसाठी सीलबंद लिफाफ्यात निविदा/बिड मागवण्यात येत आहेत. सरफैसी कायद्याच्या कलम १३ (२) आणि (४) च्या तरतुदींनुसार अधिकार आणि अधिकारांचा वापर करून मालमत्ता विकल्या जातील; **जसे आहे तिथे आहे, जसे आहे जे आहे, आणि जे काही आहे आणि विना आश्रय आधारावर** संबंधित कर्जदार आणि सह–कर्जदारांकडून सुरक्षित कर्जदार म्हणून इंडियाबुल्स एआरसी देय असलेल्या रकमेच्या वसुलीसाठी. कर्जदार/जामीनदार/गहाणखत, सिक्युरिटीज, मालक, थकबाकी देयके, कलम १३(२) अंतर्गत पाठविलेल्या मागणी सूचनेची तारीख, ताबा तारीख, राखीव किंमत, बोली वाढीची रक्कम, बक्षिसेची रक्कम ठेव (इरठे), तपासणीची तारीख आणि वेळ खालीलप्रमाणे दिली आहे:

कर्जदाराचे नाव/ जामीनदार/गहाणदार नाव	प्रतिभूत मालमत्तेचे तपशील	मालमत्तेचे मालक	०४.०३.२०२४ रोजी थकबाकी रुपये	मागणी सूचना दिनांक	ताबा दिनांक	राखीव मूल्य रु. मध्ये	बोली विस्तार रक्कम रु. मध्ये	इरठे रु. मध्ये	पडताळणी तारीख व वेळ
श्री. रमेशकुमार आर. यादव (कर्जदार व गहाणवटदार), श्रीमती रंभा आर. यादव (लॅन : एमडब्ल्यू००८०१एन)	सर्व स्थावर मालमत्तेचा तुकडा आणि भाग म्हणजे फ्लॅट क्रमांक ००२, तळमजल्यावर, १०२५ चौ.फूट आकाराचे, अपार्टमेंट्स, माणिकपूर येथील महसूल गाव, सर्वे क्रमांक ४५, हिस्सा क्रमांक ७/२, वसई–वसई–१, जिल्हा–पालघर (ठाणे) सुपर बिल्ट अप क्षेत्राच्या हद्दीत, स्वर्ग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इमारतीत विरार महानगर पालिका नोंदणी उपजिल्हा येथील.	**श्री. रमेशकुमार आर. यादव**	रु. ९४,००,०००/– (रु. चौंऱ्याणव लाख फक्त)	३१.०७.२०२०	०९.०३.२०२३	रु. ३६,००,०००/– (रुपये छत्तीस लाख फक्त)	रु. ५०,०००/– (रु. पन्नास हजार फक्त)	रु. ३,६०,०००/– (रुपये तीन लाख साठ हजार फक्त)	१२.०३.२०२६१ दुपारी २:०० ते दुपारी १:०० (पूर्वीच्या नियुक्तीनुसार)

खाते क्रमांक : २०१००४०६२३५७, लाभार्थीचे नाव : इंडियाबुल्स एआरसी–एक्सआयव्ही ट्रस्ट, बँकेचे नावः इंडसइंड बँक, शाखा : ऑपेरा हाऊस शाखा, इंडसइंड हाऊस, ४२५, दादासाहेब भडकमकर मार्ग, मुंबई–४०० ००४, आयएफएससी कोड : आयएनडीबी००००१

ई–लिलावाची तारीख आणि वेळ : १७.०३.२०२६ दुपारी २:०० ते ३:०० | सहभागाचे बोली पत्र/केवायसी दस्तऐवज/ईएमडीचा पुरावा सादर करण्याची शेवटची तारीख आणि वेळ : १६.०३.२०२६ दुपारी ४:०० वाजेपर्यंत

लिलाव इंडियाबुल्स एआरसीच्या मान्यताप्राप्त लिलावकर्ता पोर्टल **http://www.bankeauction.com** द्वारे ऑनलाइन केला जाईल आणि विक्रीच्या तपशीलवार अटी आणि शर्तींसाठी, कृपया लिलावकर्त्याच्या वेबसाइटवर दिलेल्या लिंकचा संदर्भ घ्या **http://www.bankeauction.com**

सुरक्षा हितसंबंध (अंमलबजावणी) नियम, २००२ च्या नियम ८(६) आर/डब्ल्यू ९(१) अंतर्गत विक्रीसाठी वैधानिक सूचना

ही सूचना वरील कर्ज खात्याच्या कर्जदारांना नियम ८(६) आर/डब्ल्यू ९(१), सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ आणि सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ च्या तरतुदींनुसार किमान १५ (पंधरा) दिवसांची अनिवार्य सूचना आहे, ज्यामध्ये त्यांना वरील तारखेला आणि वेळेला ई–लिलावाद्वारे लिलाव/विक्री आयोजित करण्याबद्दल माहिती दिली जाते.

तारीख : २३.०२.२०२६
ठिकाणः वसई, पालघर
सही/– अधिकृत अधिकारी, इंडियाबुल्स ॲसेट्स रिकन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड
(इंडियाबुल्स एआरसी–एक्सआयव्हीट्रस्टचे विश्वस्त म्हणून काम करत आहे)